# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.१५ वाजता)

(क) : **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)-[अनुक्रमांक (१) ते (५)] —**

(१) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोल्हापूर येथे सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना प्रभावित करू शकेल असे खंडपीठ सुरू करण्याचा विषय गेली अनेक वर्षे प्रलंबित असणे, कोल्हापूर हे वरील सर्व जिल्ह्यांचे मध्यवर्ती ठिकाण असून सदर खंडपीठाकरिता राखीव जमीन कोल्हापूरमध्ये उपलब्ध असणे, या सहा जिल्ह्यातील अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असणे, सदर खटले कोल्हापूर खंडपीठ स्थापित झाल्यानंतर या खंडपीठास वर्ग झाल्यास मुंबईतील ५० ते ६० टक्के कामाचा भार कमी होणे, सदर खटला धारकांची साधारणपणे ४५० कि.मी. प्रवासाच्या मनःस्तापापासून मुक्तता होऊन सर्वांना कोल्हापूर सोयीचे होणे, प्रवासातून मुक्त झाल्याने वेळेची देखील बचत होणे, सर्वोच्च न्यायालयाचे मा. सरन्यायाधीश यांनी देखील या खंडपीठाकरिता जून, २०२५ मध्ये सकारात्मक भूमिका मांडलेली निदर्शनास येणे, तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी कोल्हापूर येथे खंडपीठ होणेसाठी सकारात्मक पत्रव्यवहार केलेला असणे, तसेच सहाही जिल्ह्यातील वकील, विविध संस्था, संघटना व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येणारी आंदोलने यामुळे खंडपीठाऐवजी सर्किट बेंच स्थापनेचा मुद्दा समोर येणे, या सर्व मुद्यांना आधारित असा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सादर करण्याची आवश्यकता असणे, किंवा सादर केला असल्यास राज्य सरकारने वारंवार पाठपुरावा करण्याची आवश्यकता, सर्वसामान्य जनतेतून होत असलेली मागणी विचारात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी चाळी ह्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत वसलेल्या असून सदर चाळीचा पुर्नविकास गेल्या अनेक वर्षानुवर्षे रखडलेला असणे, सदरहू चाळीमध्ये बहुतांशी मराठी कुटुंबे व इतर समाजातील लोक पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणे, चाळींचा पुर्नविकास

करण्याच्या हेतूने रहिवाशी/भाडेकरुंनी सन २००५ मध्ये माझगांव ताडवाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना होऊन विकासकाची नियुक्ती होणे, सन २०१८ पर्यंत पुनर्विकासास प्रत्यक्षात सुरुवात न झाल्याने महानगरपालिकेने विकासकाची नियुक्ती रद्द करणे, परंतु आधीच मोडकळीस आलेल्या चाळींची अवस्था अधिकच बिकट होऊन चाळ क्र. १२ ते १६ या इमारती धोकादायक झाल्याने २२० कुटुंबियांना बळजबरीने माहुल येथील प्रदुषणरहित संक्रमण शिबिरात स्थलांतरित करणे, उर्वरित १८० कुटुंबियांसाठी त्याच जागेवर(माझगांव ताडवाडी) संक्रमण शिबिर बांधून राहण्याची सोय करण्यात येणे, त्या संक्रमण शिबिरांचीदेखील अवस्था सद्य:स्थितीमध्ये दयनीय असणे, उक्त माझगांव ताडवाडी चाळींच्या पुनर्विकासासंदर्भात संबंधित विभागाशी अनेकवेळा बैठका, चर्चा, प्रत्यक्ष पाहणी, पत्रव्यवहार करुनही जैसे थे परिस्थिती असणे, येथे पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या नागरिकांना शासनाने वाऱ्यावर सोडणे, परिणामी त्यांच्यामध्ये शासनाप्रती निर्माण झालेली संभ्रमाची भावना, उक्त चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गांभीर्याने घेण्याची आवश्यकता, जलदगतीने चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी न लावल्यास नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, बी.डी.डी. चाळी व काळाचौकी येथील अभ्युदयनगरमध्ये राहणाऱ्या लोकांचा पुनर्विकास करण्यात आला त्याच धर्तीवर याही चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"काम नाही वेतन नाही असा शासन निर्णय फक्त आदिवासी आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांनाच लागू असणे, कर्मचारी शाळा संहिता नुसार काम नाही वेतन नाही हा निर्णय सेवा शर्तीचा भंग करणारा असणे, इतर शाळांची संख्या वाढत असल्याने आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी पटसंख्या घटत असणे, खाजगी अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांचे शासकीय आदिवासी आश्रम शाळेत समायोजन होत नसणे, त्यांचे समायोजन फक्त खाजगी अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतच होत असणे, खाजगी अनुदानित आदिवासी आश्रम शाळांमध्ये विद्यार्थी संख्येअभावी समायोजन लवकर होत नसणे, खाजगी अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शासकीय आदिवासी आश्रम शाळेत समायोजन करण्याची गरज असणे, अतिरिक्त कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित राहावे लागत असणे, अतिरिक्त कर्मचाऱ्यांना समायोजन होईपर्यंत आर्थिक विवंचनेतून जावे लागत असणे, त्यामुळे खाजगी अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेला काम नाही वेतन नाही शासन निर्णय रद्द करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८,००० हेक्टर क्षेत्रावर अद्रक पिकाची लागवड केली जात असणे, शेतकऱ्यांना सुधारित वाण व उत्तम प्रतीचे बियाणे उपलब्ध होत नसल्याने अद्रक पिकाच्या उत्पादनात बदलत्या हवामानानुसार मोठ्या प्रमाणात कंदकुज, कंदमाशी व सुक्ष्मकृमीच्या होत असलेल्या प्रादुर्भावामुळे घट होत असणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, लागवड पद्धत, बियाणे प्रक्रिया, खत व्यवस्थापन या सोबतच मुल्यवर्धन इत्यादी समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हयात अद्रक/मसाले पीक संशोधन केंद्राची आवश्यकता असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत गल्लेबोरगाव, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्यास ७ वर्षांपुर्वी मान्यता मिळाली असणे, याबाबतीत पुढे काहीही कार्यवाही न झाल्याने सदर विषयाबाबत हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये तत्कालीन कृषि महोदय यांनी आश्वासित केले असून अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सभागृहात आश्वासित केले की ३ महिन्यामध्ये याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल तरी अद्याप काहीही कार्यवाही झालेली नसणे, मौजे गल्लेबोरगाव येथे मान्यता असलेले अद्रक संशोधन केंद्र तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रया."

(५) **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच खाजगी रुग्णालये व औषध विक्रेत्यांना काही औषध उत्पादक कंपन्यांमार्फत औषधांच्या पॅकिंगवर दर्शविण्यात आलेल्या घटकांच्या तुलनेत प्रत्यक्षात कमी सक्रिय घटक असलेली औषधे पुरविणे, काही वैद्यकीय व्यावसायिकांशी आर्थिक संगनमत करून बोगस औषधे बाजारात आणली जात असून त्यामुळे रुग्णांवर औषधांचा अनपेक्षित परिणाम होत असून आर्थिक नुकसान होवून जिवितास धोका निर्माण होणे, विशेषतः मानसोपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांमधील विशिष्ट घटकांचा अतिरिक्त वापर करून त्यापासून एमडी ड्रग्स तयार केली जात असून राज्यभरात तरुणाईमध्ये व्यसनासाठी वापरली जात असणे, शासनाची विक्री परवानगी घेतलेल्या काही औषध कंपन्या अस्तित्वातच नसून त्यांचे मूळ ठिकाण पंजाब, हरियाणा व हिमाचल येथे असणे, तसेच औषध निर्यातीसाठीही ड्रग अॅण्ड कॉस्मेटिक अॅक्ट, १९४० चे नियम न पाळता परवानग्या देण्यात येणे, उक्त प्रकरणात औषध नियंत्रण प्राधिकरणातील सहआयुक्त यांनी कंपन्यांशी संगनमत करून कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमविलेली असणे, तद्नुषंगाने काही सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांनी वरिष्ठांकडे तक्रार करुनही त्यांचेवर कारवाई करण्यास होत असलेले जाणीवपूर्वक

दुर्लक्ष, त्यामुळे शासनाप्रती सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, त्यामुळे उक्त प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत(S.I.T)चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (सकाळी ११.१५ ते ११.४५ वाजता)

**(ख) : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये —**

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना)** - **[अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **सर्वश्री योगेश टिळेकर, अमित गोरखे, सदाशिव खोत, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शाळांच्या इमारती २० वर्षांहून अधिक जुन्या असल्याने सद्य:स्थितीत विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा चिंतेचा विषय बनला असणे, शासनाने इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले असले तरी त्याची अंमलबजावणी न होणे, अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या दुर्दैवी घटनेत शाळेचे छत कोसळल्याने चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असणे, पुणे जिल्ह्यात ७३५४ शाळांमध्ये २२ लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यापैकी एकट्या पुणे शहरात १५१५ शाळांमध्ये ७ लाख विद्यार्थी असणे, मात्र येथील शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट न झाल्यामुळे कोणती इमारत धोकादायक आहे हे समजत नाही, परिणामी विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात येत असणे, पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी धोकादायक पूल, इमारती इत्यादींची ७ दिवसांत बांधकाम तपासणी करून (स्ट्रॅक्चरल ऑडिट) त्याबाबतचा अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे सादर करून धोकादायक इमारती निष्कासित करण्याचे निर्देश दिले असणे, परंतु त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नसणे, स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये इमारतीचा कालावधी, सद्य:स्थिती, स्लॅब-भिंतीचा ठिसूळपणा आणि पाण्याचा पाझर तपासून, त्या आधारे इमारतीचे अंदाजे आयुर्मान आणि स्थितीची टक्केवारी ठरवली जाते, शालेय शिक्षण विभागाकडे तांत्रिक ज्ञान नसल्याने बांधकाम विभागाकडून शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे गरजेचे असणे, ऑडिटमुळे नेमकी आवश्यक कामे समोर येतील आणि शासनाला उक्त कामांकरिता तेवढाच निधी मंजूर करून तसेच निधीचे नियोजन करुन त्यामध्ये बचतही करता येणे, पुणे शहरातील अनेक शाळांच्या इमारती जुन्या असून काही अनधिकृत असल्याने त्यांची तपासणी करून कारवाई होणे आवश्यक असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करून योग्य ती उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शहापूर (मोठा पाडा) (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील एमआयडीसीने १५ वर्षांपूर्वी स्थानिक शेतकऱ्यांकडून जमिन संपादित केली असणे, माहे डिसेंबर, २०२४ मध्ये भरती-ओहोटीच्या दाबामुळे उघाडीचे दरवाजे मोडकळीस आले असणे, व काही दरवाजे फुटले असल्याने सुमारे १५० एकर सुपीक खार जमिनीवरील भातशेती आणि मत्स्यपालन तलावांमध्ये खारे पाणी शिरल्याने भातशेतीसह, मत्स्यव्यवसायाचे नुकसान झाले असणे, तसेच भरतीच्या वेळी खारे पाणी गावात शिरून घरांना वेढत असल्याने घरांचे आयुष्य कमी होत असणे, दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी खारभूमी व महसूल विभागाने याबाबत नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करावे, एमआयडीसीने शेतकऱ्यांची जीवित हानी व वित्त हानी रोखण्यासाठी त्वरित उघाडीचे दरवाजे दुरुस्त करावेत, अशी मागणी शहापूर येथील ग्रामस्थांनी अलिबाग एमआयडीसी विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली असणे, शेतकऱ्यांनी एमआयडीसीला जमीनी देऊन १५ वर्ष पूर्ण झाली असून, उपजीविकेसाठी शेतीही करता येणार नसल्यामुळे आता उत्पन्नासाठी कोणतेही साधन नसल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता व असंतोष निर्माण झाला असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे –**

(क) **तारांकित प्रश्न.**

(ख) **तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे. -**

(१) "**उरण (नवी मुंबई) येथील सिडको प्रकल्पग्रस्त साडेबारा टक्के योजनेतंर्गत भूखंड वाटपाच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**" या विषयावरील श्री. रमेशदादा पाटील व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १९८७० ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) "**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत**" या विषयावरील श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २५५४ ला दिनांक ३ जुलै, २०२५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उद्योग मंत्री** : **(क)** "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा अनुक्रमे साठावा व एकसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **महिला व बालविकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **कृषी मंत्री** : **(क)** "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांचे सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांचे सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **रोजगार हमी योजना मंत्री** : "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २५ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

कृषी पंपाचे थकीत वीज बील माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला असतानाही शेतकऱ्यांवर सरसकट वीजबील भरण्याचा लावण्यात येत असलेला तगादा.

(२) **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २६ वर इतर मागास बहुजन कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर येथे धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत "श्रीमंत राजे यशवंतराव होळकर विद्यार्थी विकास योजना" राबविताना झालेली अनियमितता.

(३) **श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २४ वर मदत व पुनर्वसन मंत्री निवेदन करतील :-**

मोर्बे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, बारवी धरणग्रस्तांप्रमाणे कोणतेही निकष न लावता कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेबाबत होत असलेली मागणी.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भारतीय संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्याचा मुलभूत अधिकार असणे, परंतु महाराष्ट्रामध्ये 'क्रिप्टो-ख्रिश्चन' या लोकांकडून या धर्मस्वातंत्र्याचा दुरुपयोग सुरु असणे, महाराष्ट्रातील 'क्रिप्टो-ख्रिश्चन' लोक हे मुळात हिंदू धर्मीय व अनुसूचित जाती/जमाती, भटक्या व विमुक्त जाती इत्यादी प्रवर्गातील असणे, परंतु सदर लोकांनी गुप्तपणे ख्रिश्चन धर्म स्वीकारुन, या धर्माच्या प्रथा, परंपरा व प्रार्थनापध्दती छुप्या पध्दतीने पाळत असणे व यांचा अंत्यविधी ख्रिश्चन पध्दतीने होत असल्याने यांच्या अंत्यविधीवेळी त्यांचा खरा धर्म दिसून येणे, महाराष्ट्रात 'क्रिप्टो-ख्रिश्चन' लोकांकडून हिंदू धर्म व आरक्षित जातप्रवर्गाचा कागदोपत्री वापर करुन शिक्षणात, नोकरीमध्ये तसेच निवडणुकांमध्ये आरक्षणाचा लाभ घेतलेला असणे व घेत असणे, अशाप्रकारची फसवणूक महाराष्ट्रातील नंदुरबार, सांगली व अहिल्यानगर या जिल्ह्यांत प्रामुख्याने सुरु असणे, 'क्रिप्टो-ख्रिश्चन' लोकांच्या दांभिकपणा व खोटेपणामुळे, महाराष्ट्रातील दुर्बल व वंचित घटकांतील खरे लाभार्थी यांना आरक्षणाच्या लाभांपासून व शासकीय सोई-सुविधांपासून वंचित रहावे लागत असणे, यामुळे

संविधानातील ‘सामाजिक न्याय व कल्याणकारी राज्य’ या तत्वांना हरताळ फासला जात असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाचे "सी. सेल्वारानी वि. जिल्हाधिकारी (२०२४)" या प्रकरणातील निकालानुसार, ‘गुप्तपणे ख्रिश्चनधर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तींकडून कागदोपत्री हिंदू धर्माचा व जातींचा आरक्षणासाठी वापर करणे, हे अनैतिक कृत्य असून, ही एक प्रकारे संविधानाची फसवणूक असणे,’ त्यामुळे ‘क्रिप्टो-ख्रिश्चन’ लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी शासनाची भूमिका व उपाययोजना."

(२) **श्री. संजय केणेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाच्या मागे असणाऱ्या नगर भूमापन क्र. ४७९६/ब व ४७९९ मधील सार्वजनिक जागेवर अतिक्रमण तसेच अस्वच्छता असणे, सदर जागेवर महानगरपालिकेचे कंत्राटदार शहरातील कचरा आणून टाकत असणे, त्यामुळे सदर परिसराला डंपीग ग्राऊंडचे स्वरुप येणे, तसेच या परिसरात पावसाळ्यामध्ये पाणी साचून प्रचंड प्रमाणात दुर्गंधी, गाळ, खड्डे व पावसाचे दुषित पाणी यामुळे रस्त्यावर चालणेही कठीण होणे, कचऱ्यामुळे व साचलेल्या पाण्यामुळे डासांद्वारे होणारे मलेरीया, डेंग्यु या प्रकारच्या साथीच्या रोगांचे प्रमाण या परिसरात मोठ्या प्रमाणात असणे, तसेच या भागात जिल्हा परिषदेची कन्या शाळा, सरस्वती भुवन शाळा व इतर कॉलेजेस असणे, यामुळे सदर परिसरात विद्यार्थ्यांचा, पालकांचा व ज्येष्ठ नागरिकांचा वावर असणे, या जागेत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे झालेली असणे, या अनधिकृत इमारतींमध्ये अवैध धंदे सुरु असल्याने या परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असणे, त्यामुळे शालेय विद्यार्थींनी, महिला तसेच जेष्ठ नागरीक यांना याचा त्रास होत असणे, सदर दुरावस्थेबाबत जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना वारंवार निवेदने, तक्रारी अर्ज दिलेले असणे, सरकारी अधिकाऱ्यांचे कंत्राटदार आणि अतिक्रमणधारकांसोबत आर्थिक हितसंबंध असल्याने कोणतीही कारवाई होत नसणे, त्यामुळे सदरच्या गंभीर प्रकरणात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"प्रेमनगर एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई येथील आठ वर्षांपूर्वी खोल्या पुनर्विकास करण्यासाठी देण्यात येणे, त्यावेळी सदर खोल्यांचे दोन वर्षांचे भाडे देऊन सदनिका ताब्यात घेऊन तोडण्यात येणे, सहा वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी सदर खोल्यांचे भाडे देण्यात न येणे, सध्या या

रिकाम्या जागेवर बांधकाम करुन सदर खोल्या राजकीय व्यक्तीच्या सहकाऱ्यांकडून गृहनिर्माण संस्थेच्या प्रवर्तकांना २५ लाख रुपयांना विकण्यात येणे, झोपडपट्टीतील खोल्या या काही राजकीय व्यक्ती स्थानिक गोर-गरीब खोलीधारकांना दमदाटी करुन परस्पर विक्री करित असणे, या झोपडपट्टी माफियांच्या नावे अनेक गुन्ह्यांची जुहू, खार आणि सांताक्रुझ पोलीस ठाण्यात नोंद असणे, परिणामी सदर सदनिका धारक व झोपडपट्टीधारकांत भितीचे वातावरण पसरणे, त्यामुळे विलेपार्ले येथील झोपडपट्टी माफियांविरुद्ध कारवाई करुन स्थानिक सदनिका धारकांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (संभाजीनगर) मार्फत वॉटर ग्रीड व जलजीवन मिशन योजनेच्या कामासाठी गंगापूर तालुक्यातील शिवना नदीपात्रातील सनव या राखीव वाळू पट्टयातून ९ हजार ६०० ब्रास वाळू उपासण्याचा ठेका रॉयल्टीसह ६३ लाख ६० हजार रुपयात जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात येणे, तथापि, कंत्राटदाराने त्याऐवजी २७ कोटी रुपयाची १८ हजार ब्रास जास्तीची वाळू उपासण्याची घटना जून, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रांत अधिकारी यांनी २७ कोटी रुपयाची ही वाळू असल्याचा चौकशी अहवाल सादर केला असून त्यामध्ये पर्यावरण कायद्यासह मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे नमूद असणे, प्राधिकरणाला ९६०० ब्रास वाळू हवी होती, तेवढी उपसल्यानंतर ठेका बंद करणे गरजेचे असताना अवैधरित्या ठेकेदारांनी २८ हजार ब्रास वाळू उपसून त्यामध्ये केलेला गैरव्यवहार, या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(५) **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने धान उत्पादक शेतकरी बोनस खात्यात चार्मोशी, जि. गडचिरोली येथील सन २०२४ दरम्यान मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे समोर येणे, येथील काही दलालांनी शासनाचा बोनस लाटण्यासाठी तालुका खरेदी, विक्री संघ, मर्या. चार्मोशी, र. जन. ६२६ येथील संचालक मंडळ व सचिव यांच्याशी संगनमत करणे व ज्या नागरिकांच्या नावावर शेती नसणे त्यांना शेतकरी दाखवून काही भूमीहीन व्यक्तींच्या नावे व जे अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांचे नावे ५ एकर शेती दाखवून सरसकट रु.४० हजार बोनस लाटणे, तसेच एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना ८० हजार रुपये बँक खात्यात जमा करुन

शासनाची लुट करणे, यासंदर्भात नियुक्त समितीनेही या अनियमिततेवर मुद्दे उपस्थित केले असणे, परंतु शासन येथील दलाल व संचालक मंडळ, पदाधिकारी यांना पाठीशी घालत असणे, त्यामुळे शासन कारवाईत होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री सदाशिव खोत, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका हद्दीत वस्त्रोद्योग क्षेत्राशी निगडीत, धागे तसेच कापड तयार करणारे मोहम्मदीया, गुलजार, अल-इमरान, कोहीनूर, सुमित, नबी मामा, बालाजी, हबीब इत्यादी सायझिंग वर्क्स/कारखाने असणे, या परिसरातील बहुतांश सायझिंग वर्क्स या कारखान्यांनी महसूल विभाग, महानगरपालिका कार्यालय, नगररचना कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एम.एस.ई.बी. इत्यादी कार्यालयांकडून आवश्यक त्या परवानग्या व आदेश प्राप्त करून घेतलेले नसणे, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्यांचे जागेची मोजणी न करता, सदर वर्क्स/कारखाने बेकायदेशीर व अनधिकृतरित्या सुरू केलेले असणे, त्याचबरोबर या कारखान्यांतील उपकरणे व बॉयलर्स यांना महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी नसणे, कारखान्यांत कोळसा, खनिज तेल व रासायनिक पदार्थ जाळून, बॉयलर्स व धूरकांडे याद्वारे मोठ्या प्रमाणात धूर व प्रदुषके हवेत सोडली जात असणे, तसेच कारखान्यातील यंत्रांमुळे ध्वनी प्रदूषण व सांडपाण्यामुळे पाणी प्रदूषण होत असणे, या विविध प्रकारच्या प्रदूषणांमुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे व त्वचेचे आजार होत असणे, त्याचबरोबर कॅन्सरसारख्या गंभीर आजारामुळे नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला असणे, या सायझिंग कारखान्यांवर कारवाई करावी म्हणून नागरीकांनी शासनाकडे तसेच प्रशासनाकडे अनेक तक्रारी केलेल्या असणे, परंतु आजपर्यंत या कारखान्यांवर ठोस कारवाई झालेली नसणे, या परिसरात नियमबाह्य सुरू असलेल्या कारखान्यांवर तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना."

(७) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य व जिल्हा रस्त्याची कामे करताना महामार्ग व रस्त्यालगतच्या लाखो झाडांची तोड केल्याचे जून, २०२५ मध्ये उघडकीस येणे, यामध्ये विशेषत: नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गालगतची ३ लाख वृक्ष, रत्नागिरी-नागपूर महामार्गालगतची २ लाख वृक्ष, मुंबई-पुणे द्रुतगती

महामार्गावरील ३५ हजार वृक्ष, पुणे-बंगलूर रस्त्यालगतची १२ हजार वृक्ष, कोल्हापूर-कळे रस्त्यालगतची १४०० झाडांची झालेली तोड, रस्ते विकास महामंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तोडलेल्या झाडांची आकडेवारी उपलब्ध नसणे, ज्या कंपनीला काम दिले आहे त्या कंपनीनेच भूसंपादनासह मोठ्या प्रमाणावर झाडांची केलेली तोड/कत्तल, खाजगी कंपनीला आरटीआय लागू नसल्यामुळे वृक्षतोडीची नेमकी आकडेवारी उपलब्ध नसणे, परिणामी रस्त्यालगत असलेली मोठी झाडे नामशेष होऊन पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, यामुळे राज्यातील पर्यावरणावर व नागरीकांच्या आरोग्यावर होत असलेला दुष्परिणाम, एकास पाचप्रमाणे वृक्ष लावण्याची सक्ती असतानाही महामार्गासह इतर रस्त्यालगत अद्याप झाडांची लागवड करण्यात न येणे, त्यामुळे शासनाच्या नियमांची होत असलेली पायमल्ली, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी भविष्यात निसर्ग साखळीवर दुष्परिणाम होऊन नागरीक, पशुपक्षी यांना होत असलेला त्रास लक्षात घेता शासनाने तात्काळ वृक्षतोड संदर्भातील १९७२ च्या कायद्यात बदल करुन वृक्षतोड करण्यास आळा घालण्याच्या दृष्टीने व नियमानुसार झाडे लावण्याबाबत करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाची भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

(१) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पोलीस प्रशासनाकडून हिंदू समाजातील तरुणांवर राजकीय दबावाखाली खोटे गुन्हे दाखल होत असणे, राजकीय हस्तक्षेपामुळे हिंदू समाजातील व्यक्तींवर झालेला अन्याय, अत्याचार, शारीरिक हल्ले व आरोपींनी त्यांच्या मालमत्तेचे केलेले नुकसान इत्यादी गुन्ह्यांबाबत पोलिसांकडून सहजासहजी तक्रार दाखल करुन घेतली जात नसणे, यामुळे हिंदू समाजातील व्यक्तींना प्रचंड त्रास होत असणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या संचलनात धार्मिक भावना दुखावतील अशा घोषणा देणे, परंतु पोलिसांनी हिंदू तरुणांवर लाठीचार्ज करणे, पतितपावन मंदिरात महाआरतीचे शांततेत आयोजन करणे, परंतु पोलिसांनी सदर महाआरतीत सहभागी होणाऱ्या ३ ते ४ हिंदू तरुणांवर गुन्हे दाखल करणे, भाटकरवाडा पेठकिल्ला येथे दुचाकी जाळून तेथे धार्मिक तेढ निर्माण होईल असे पत्रक टाकलेले असणे, परंतु या प्रकरणात तक्रारदार हाच आरोपी असल्याचे सिद्ध होऊनही, परिसरातील हिंदू तरुणांना पोलिसांकडून नाहक त्रास दिलेला असणे, संगमेश्वर/देवरुख येथील नागरीक पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रध्दांजली वाहत असताना, नाविद कापडी नामक व्यक्तीकडून याची खिल्ली उडविणे, त्याच्या या कृत्याबाबत नागरीकांनी त्याला जाब विचारला असता त्याने व त्याचा सराईत

गुन्हेगार मित्र छोट्या गवाणकर याने नागरीकांना जीवे मारण्याची धमकी दिली असणे, शासकीय तंत्रविद्यालयात राष्ट्रगीत ऐवजी नमाज पढला जात असणे, याबाबत पोलिसांना कळवूनही त्यांनी कोणतीही कारवाई केलेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री धीरज लिंगाडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"बुलढाणा शहरातील जुने पोलीस अधिक्षक कार्यालय समोरील डी.एड. आणि बी.एड. महाविद्यालयाकरीता राखीव असलेल्या शैक्षणिक प्रयोजनाची जागा (नझुल शिट क्र. १० ए. भूखंड क्र. ५/१) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असणे, सदरहू जागा नगरपालिकेने वाणिज्य प्रयोजनाकरीता मागितली असणे, सद्य:स्थितीत सदर जागेवर शैक्षणिक आरक्षण असून ही जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणारे महाविद्यालय व कौशल्य विभागाच्या अभ्यासक्रमासाठी उपयोगाची ठरणार असणे, तसेच जिल्ह्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील शिकाऊ विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी या जागेचा उपयोग होणार असणे, बुलढाणा शहराच्या प्रलंबित असलेल्या विकास आराखड्यात अडचणी निर्माण होऊ नये याकरीता बुलढाणा जिल्ह्यातील उक्त जागा नगरपालिकेच्या वाणिज्य प्रयोजनासाठी देण्यासाठी नाकारण्यात येणे, सदरील जागा नगरपालिकेला वाणिज्य प्रयोजनाकरीता देण्यासाठी नगरविकास विभाग प्रयत्न करीत असणे, यामुळे बुलढाणा शहराचा विकास आराखडा ६ महिने प्रकाशित झालेला नसणे, त्यामुळे ही जागा नगरपालिकेला देऊ नये अशी होत असलेली मागणी, परंतु शासन याकडे करत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने बुलढाणा शहराचा विकास आराखडा तात्काळ प्रकाशित करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"स्वयंपुनर्विकास/ समुह पुनर्विकासासाठी ३० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक जुन्या इमारती स्वयं/समूह पुनर्विकासासाठी पात्र असतील, ३० वर्षांची गणना करण्यासाठी पूर्णत्वाचा दाखला किंवा भोगवटा प्रमाणपत्र किंवा मालमत्ता कराच्या पहिल्या देयकाची तारीख, यापैकी जे अगोदर प्राप्त झाले असेल त्या तारखेपासून इमारतीच्या वयोमानाची गणना करावी अशा अनेक प्रकारच्या शिफारशीबाबतचा सहकारी गृहनिर्माण संस्था समुह/स्वयंपुनर्विकास अभ्यास गटाच्या अध्यक्षांनी आपला अहवाल सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी शासनास सादर केला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**सात : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**आठ : सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड. अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची पायमल्ली होत असून विविध ठिकाणी घरफोड्या, दरोडे, खून, सायबर गुन्हे, संघटित गुन्हेगारी तसेच महिला व अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून बीड, पुणे व इतर जिल्ह्यांतून गंभीर प्रकार समोर येणे, पुण्यातील हगवणे कौटुंबिक प्रकरणात झालेला न्यायालयीन व प्रशासकीय विलंब, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपीस अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश, परभणी येथे सोमनाथ सुर्यवंशी यांना झालेल्या मारहाण प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना देऊनही अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, मुंब्रा येथील रहिवाशी जमील शेख यांची राजकीय वादातून झालेली हत्या, याचप्रकारे राजकीय पक्षाचे पदाधिकारी राजरोसपणे खून करीत असल्याच्या घटना घडत असून त्यांना अटक करण्यापासून संरक्षण देण्याचा सुरु असलेला प्रयत्न, अंमली पदार्थाच्या तस्करीत वाढ झालेली असून विविध प्रकरणात पोलिसांचाच समावेश असल्याचे तपासात निष्पन्न झालेले असणे, राज्यात पोलीस यंत्रणेचा वापर करून विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर दबाव आणून पक्षांतर घडवून आणण्याचे सुरु असलेले प्रकार, काही मंत्र्यांकडून स्वतःचा हेतू साध्य करण्यासाठी होत असलेला पदाचा गैरवापर, त्यांच्या खात्यामध्ये झालेले घोटाळे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्यामुळे प्रशासकाचा सुरु असलेला मनमानी कारभार व त्यामुळे महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभूत सुविधांचा उडालेला बोजवारा, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधीचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, निधी अभावी स्थानिक स्वराज्य संस्थांची विकास कामे प्रलंबित असणे, मुंबईतील मोक्याचे भूखंड खाजगी विकासकास देण्याचा सुरु असलेला प्रयत्न तसेच रस्त्याच्या कामात झालेला

गैरव्यवहार, ठाणे येथील रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टची जागा चुकीच्या पद्धतीने हस्तांतरण करुन शासनाची केलेली फसवणूक, कोकणातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, महसूल, वने, नगरविकास, सामाजिक न्याय, गृह तसेच इतर विभागातील निविदा प्रक्रिया व अन्य कामात गैरव्यवहार उघडकीस येणे, राज्यात आपल्या जवळील व्यक्तीच्या फायद्यासाठी मद्यविक्री परवाने देण्याची कार्यवाही सुरु असणे, त्यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या अधीन जाऊन अनेक संसार उद्ध्वस्त होणार असणे, महाराष्ट्रात मराठी भाषेची होत असलेली गळचेपी, मेंढपाळ समुदायाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

नऊ : **(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ व बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ. मनिषा कायंदे, श्री. अमोल मिटकरी, अॅड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री संजय खोडके, सदाशिव खोत, कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, अमित गोरखे, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, धर्मगुरू राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असणे, राज्यातील सहकारी संस्थांच्या विकासासाठी व ग्रामीण पतपुरवठा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकार विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या असणे, 'सहकारातून समृध्दी' हा विकासात्मक दृष्टीकोन वास्तवात उतरविण्यासाठी केंद्र शासनाने 'सहकार मंत्रालयाची' स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले असणे, कृषी पतपुरवठा, सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेची अंमलबजावणी ५ वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली असणे, सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृध्दीसाठी अटल अर्थसहाय्य योजनेस मुदतवाढ दिली असणे, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतरत्न डॉ. ए.पी. जे. कलाम

अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येत असणे, आदिवासी उपाययोजनेच्या तरतुदीत मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के एवढी भरीव वाढ करण्यात आली असणे, कोकणातील पर्यटनवृद्धी व्हावी व पर्यटकांचा प्रवास सुलभ व सुखकर व्हावा यासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना राष्ट्रीय / राज्य मार्गांशी जोडण्याचे काम हाती घेण्यात आले असणे, आंगणेवाडी हे राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने येथील मंदिराला जोडणाऱ्या ३३ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन ही ७५ कोटी रुपये किंमतीची कामे प्रगतीपथावर असणे, पर्यटन क्षेत्रात खाजगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पर्यटन धोरण-२०२४ जाहिर करण्यात आले असणे, लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकासाकरिता लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली असणे, समुद्रातही पिंजरा पद्धतीने मत्स्य पालनास प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्य शासनाने ठरविले असणे, राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांसाठी राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरण आखले असणे, मच्छिमार बांधवांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पालघर जिल्हयातील साठपाटी येथे सर्व सुविधांयुक्त आदर्श मच्छि बाजारपेठ उभारण्याचे प्रस्तावित असणे, सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्के पर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदाला रापणीच्या तयार जाळयांच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान देण्यात येणार असणे, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी व राज्याला सृजणातून समृध्दीकडे नेण्यासाठी केलेल्या व करावयाच्या उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) सर्वश्री अंबादास दानवे, सुनिल शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"छत्रपती संभाजीनगर येथील वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वॉटरग्रेस या खाजगी कंपनीस "कन्सेन्ट टू एस्टॅब्लिशमेंट" ने परवानगी दिलेली असणे, सदर परवानगी देताना नियमानुसार आवश्यक असलेले महानगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), तसेच संबंधित यंत्रणांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेताच सदर मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, वॉटरग्रेस या कंपनीला महानगरपालिकेमार्फत गत २० वर्षांसाठी वैद्यकीय कचरा प्रक्रिया प्रकल्पाचा करार देण्यात आलेला असणे, पुन्हा कोणतीही खुली निविदा प्रक्रिया न

राबविता त्या कंपनीस मुदतवाढ देण्यात आलेली असणे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा संनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार बायोटेक वेस्ट लिमिटेड या नव्या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असणे, सदर कंपनी पर्यावरणीय दृष्ट्या अधिक सुरक्षित व स्वयंचलीत तंत्रज्ञान वापरणारी असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले असणे, तरीदेखील प्रदूषण नियंत्रण मंडळाने बायोटेकच्या प्रस्तावाला नकार देत वॉटरग्रेसच्या बाजूने निर्णय दिलेला असणे, सदरची बाब शासन यंत्रणेमध्ये नियमबाह्य कार्यपद्धती, संभाव्य हितसंबंध व पारदर्शकतेच्या अभावाकडे निर्देश करित असून, पर्यावरणीय, सार्वजनिक आरोग्य व प्रशासकीय पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरूपाची असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(२) सर्वश्री किरण सरनाईक, विक्रम काळे, जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात सन १९९० च्या दशकात आर्थिक परिस्थितीमुळे खाजगी शाळांना पूर्ण अनुदानाऐवजी टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याची योजना शासनाने स्वीकारली असणे, अनुदान टप्पा लागू झाल्यानंतर प्रचलित पध्दतीने पुढील पाच वर्षांच्या कालावधीत १००% अनुदान मिळणे निश्चित होणे, परंतु सन २०१६ नंतर शासनाने या अनुदान वितरणाची प्रचलित पध्दत व्यपगत करुन अनुदान वाटपात मनमानी पध्दतीने अनुदान टप्पा जाहीर करणे, त्यामुळे राज्यातील हजारो प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी १५ ते २० वर्षांपासून विनावेतन किंवा अत्यल्प वेतनावर सेवा देत असणे, यांच्यापैकी अनेकांचे शाळा मुल्यांकन पूर्ण झाले असूनही, अद्याप अनुदान वितरित झालेले नसणे, शिक्षक संघटनांनी दीर्घकाळ आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधणे, परिणामी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार निवडणुकीपूर्वी शासनाने टप्पा अनुदान जाहीर केले असणे, मात्र त्यानंतर ९ महिने उलटून गेले असतानाही कोणतीही अंमलबजावणी झालेली नसणे या विलंबामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य उपचार व दैनंदिन गरजा धोक्यात आल्या असणे, काही शिक्षकांनी उपासमार व मानसिक तणावामुळे आत्महत्या केली असल्याचेही नोंदविले गेले असणे, त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्ता व सातत्यावर प्रतिकूल परिणाम होत असणे, या पार्श्वभूमीवर, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करणे आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १६ जुलै, २०२५.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद.